श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

अंक १०, वर्ष ८ ] मार्गशीर्ष [ शके १८५३

विनमनिताय



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥

—शंकराचार्य.

—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका.


| | |
|---|---|
| अनुभव ... ... ... ... ... ... | १–२० |
| श्री शिरडी संस्थानचा शके १८५३ सालचा श्रीगुरुपौर्णिमेच्या जमाखर्चाचा तक्ता ... | १--३ |
| अहिल्योद्धार ... ... ... ... ... | १-१० |


## विनंति.

सुप्रसिद्ध श्री मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतानें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची " यशोदा पांडुरंगी " टीका जी साठ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं. रु. २.

कै. गोविंदराव रघुनाथ दाभोळकर यांचा सुप्रसिद्ध ओजस्वी व प्रासादिक श्रीसाईसच्चरित हा ग्रंथ बांधून तयार आहे. पानें अदमासें १०००. किं. रु. २--८--०.

**रा. आ. तर्खड.**

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला कचेरी.**

## श्री साई भक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्री साईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्री साईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

**रा. आ. तर्खड**

—प्रकाशक.

1930
Amc-10

# अनुभव

गुरुवार ता. ५ नवेंबर १९३१ रोजीं सकाळीं सुमारें ७-३० वाजतां एक महापुरुष एकाएकीं घरीं आले. त्यांचें येणें आज तीन चार वर्षांनीं झालें. त्यांनीं आग्रहपूर्वक विनंति केली कीं पंढरीस जाऊन यावें. दिवाळीच्या सणानिमित्तानें आगगाडीच्या खास सवलती झाल्या आहेत. शनिवारीं रात्रीं मद्रास मेलनें निघावें. रविवारीं सकाळीं ८-३० वाजतां पंढरी पंढरीस नुसती नजर फेंकावी. इकडे तिकडे पाहावें, आणखी कांहीं करणें नलगे. संध्याकाळीं साडेपांच वाजतां पंढरीहून निघावें आणि मद्रास मेल पकडून सोमवारीं सकाळीं मुंबई.

मन ललचावलें. परंतु पुन्हां मनांत विचार आला कीं दोन रात्रींचें जागरण, आणि दर्शनाची वगैरे रेंटारेंट, आपला वृद्धापकाळ, शिवाय श्री-पांडुरंगरायाबरोबर आपलें कितीएक वर्षांचें एक प्रकारचें भांडणच कीं "तूं जवळ न घेतां पुनः पुनः संसारांत परत पाठवितोस त्या तुला काय म्हणावें!"

पुन्हां वाटलें कीं श्रीदासगणूंनीं वर्णन केलेल्या आपल्या महाराष्ट्रीय संतांच्या युनिव्हर्सिटीचे श्रीविठ्ठलराय हे महा चान्सेलर, त्यांचीं चित्रें पहावीं तर तीं अगदीं अनाकर्षणीय, तेव्हां हें गौडबंगाल आहे तरी काय तें प्रत्यक्ष पहावें. !

एक मुलगा वारकरी आहे त्याची कुटुंबासहित दरवर्षाची पंढरीची वारी असते, त्याला माझ्याबरोबर जाण्याचें सुचविलें. त्याप्रमाणें शनिवारीं रात्रीं निघावयाचें ठरविलें, आणि बोरीबंदरवर जाऊन दोन टिकिटें काढून जागा रिझर्व्ह केल्या. संध्याकाळीं घरीं आलों, तों पर्यंत ते सत्पुरुष घरींच होते. त्यांनीं आनंद प्रदर्शित केला व तावडतोब वऱ्हाडांत जाण्यासाठीं निघून गेले.

शनिवार ता. ७ रोजी रात्रीं मद्रास मेलनें निघून रविवारीं सकाळीं ५-३० वाजतां कुर्डुवाडीस पोंहचलों. तेथें बार्सी लाइट रेल्वेचे ट्राफिक

सुपरिन्टेन्डेन्ट रा. रा. आजरेकर मित्रमंडळीसहित भेटले. श्री. आजरेकर-साहेब आणि त्यांचे बंधु बेळगांवचे वकील श्री केशवराव आजरेकर हे श्रीसाईबाबांच्या बालगोपाळांपैकी अत्यंत आस्थेवाईक सद्‌गृहस्थ आहेत.

श्री आजरेकरांनी व त्यांच्या मित्रमंडळींनी कुर्डुवाडीस रेल्वे कंपाउन्डमध्ये सरकारकडून जमीन मिळवून अत्यंत रमणीय असे एक श्रीराम मंदीर बांधलें आहे. सायंकाळीं श्रीरामचंद्राचें दर्शन घ्यावयाचें कबूल करून ६—३० वाजतां कुर्डुवाडी सोडून ८--३० वाजतां पंढरीस गेलों. पुलावरून श्रीचंद्रभागेचा देखावा सकाळच्या प्रहरीं रमणीय व आल्हादकारक वाटला.

श्रीगोवर्धनबुवांच्या धर्मशाळेंत उतारा केला. मुलगा येथेंच उतरत असतो. ही टोलेजंग इमारत स्टेशननजिक पंढरपूरच्या रस्त्यावर अति सुंदर, स्वच्छ व हवाशीर ठिकाणीं बांधलेली आहे.

या इमारतीपुढें एखादा राजवाडा तुलनेस अपुरा पडेल. यांत यत्किंचित अतिशयोक्ति नाहीं. मुख्य दरवाजानें आंत शिरल्यावर एक सुंदर चौक लागतो. या चौकाच्या चारही बाजूला दोन मजल्याच्या सुंदर इमारती आहेत, त्यांच्या पुढच्या व कित्येकांच्या मागल्या बाजूस खुले सज्जे आहेत. जेणेंकरून वारा कोणत्याही दिशेचा असला तरी तो या इमारतींत हमेशा सारखा खेळत राहतो. प्रत्येक दालनाच्या खोल्या विस्तीर्ण आहेत आणि त्यांची जमीन उत्तम तऱ्हेनें घोटलेली आहे, जेणेंकरून ती तावडतोब धुवून स्वच्छ करितां येते. या इमारतीशिवाय आणखी दोन चौक चारही बाजूंनी बांधलेल्या दालनांसहित आहेत. स्वयंपाकाकरितां भांडीं मिळतात जी धर्मशाळा सोडण्यापूर्वी परत सुपूर्त करावयाचीं असतात. धर्मशाळेची कामदार मंडळी आपआपल्या कामांत अत्यंत दक्ष व निष्ठायुक्त अशी आढळली.

स्नानें करून श्रीपांडुरंगाच्या दर्शनासाठी निघालों. दिपवाळीसाठी यात्रेकरूंची रग नुकतीच सुरू झाली होती. महाद्वारांतून शिरल्यावर आजूबाजूची बांधणी कोणत्या घाटाची आहे, बुद्धधर्मीय काळाची आहे किंवा कशी याकडे विशेष लक्ष दिलें नाहीं. तरी पण देवाळ्याची आकर्षणीय बांधणी पाहात पहिल्या सभामंडपांतून श्रीनामदेवाची पायरी ओलांडून आंत गेलों.

वर वर्णन केलेल्या श्री विठ्ठलरूपी चान्सेलरसाहेबांच्या समीप जातांच आश्चर्य वाटलें. चान्सेलर साहेबांच्या रूपांत काय मोहकता आहे तें सांगवत नाहीं, लिहितां येत नाहीं. श्री ज्ञानदेवादि संतांपासून आजतागायत सर्व संतांना वेड लावणारी अशी ही मूर्ती आहे खास. आनंदाचें भरतें येऊन देवाच्या पायावर मस्तक ठेवलें. बायकोच्या अनुभवाची आठवण झाली. अत्यंत विस्मय वाटला. श्रीच्या बडव्या गड्यानें श्रीचा हार गळ्यांत घातला. अतिप्रसंग होतो असें वाटलें. गळ्यांतून हार काढूं, लागलों. बडवे गृहस्थ म्हणाले, “असोंद्या, इकडचा रिवाज असा आहे कीं, देवळांत गळ्यांतला देवाचा हार काढूं नये. देवळाबाहेर गेल्यावर काढावा.” कसेंसेंच वाटलें. देवा माझी योग्यता ती काय ! केवळ अनधिकारी य:कश्चित् मनुष्य, नाहीं कसचें अध्ययन, नाहीं कसचें साधन ! चित्रांत तूं कसा विद्रुप दिसतोस, आणि येथें तुझें कसें प्रेमपूर्वक अवलोकन ! आहे तरी काय ! अथवा, हा माझ्या सद्गुरु माउलीचेच खेळ की त्यामुळें तुझें असें मोहक रूप मला माझ्या चर्मचक्षूंनीं दिसावें !

“रूप पाहतां लोचनीं,” “काय मौजेचा पंढरीनाथ,” “सुंदर तें ध्यान” वगैरे वगैरे तुझी वर्णनें विद्युत् वेगानें डोक्यांत आलीं ! आपल्यामुळें भाविक मंडळींचा खोळंबा होत असेल म्हणून पुन्हा एकदां मस्तक पायांवर ठेवून देवाकडे दृष्टि फेंकून, त्याची रजा घेऊन जड अंत:करणानें देवळाबाहेर पडलों.

बाहेर येतों तों मुलानें कान्होपात्रेचें झाड दाखविलें. त्याला नमस्कार करून श्रीरुक्मिणीच्या देवळांत गेलों. माता आनंदांत दिसली तिच्या

भालप्रदेशीं कुंकुमाचा टिळा लावून व पुन्हा श्रीफळ व गळ्यांतल्या हाराचा प्रसाद मिळवून आनंदानें मंदिराबाहेर पडलों आणि बिऱ्हाडाकडे वळलों. (या प्रसंगावरून अशाच एका अनुभवाची श्रीरामेश्वराच्या सन १९१० च्या यात्रेंत घडलेल्या प्रकाराची आठवण झाली जी पुढेंमागें श्रीलीलेच्या एखाद्या अंकांत कदाचित् येईल.)

असो! वेळ मध्यान्हीची होती. यावेळीं श्री गोधडेबुवांच्या धर्मशाळेंतून त्याच्यालागतच्या खुल्या आवारांत, गांवातल्या सर्व आंधळ्या लंगड्या, लुल्या आणि व्याधिग्रस्त अशा सर्व अपंग व अनाथ लोकांस ताजें शिजविलेलें अन्न पुरविण्यांत येतें. एक दिवस भात आणि आमटी, दुसऱ्या दिवशीं भाकरी असें आळीपाळीनें देण्यांत येतें. त्या दिवशीं भात आणि आमटी वाढण्यांत आली. अन्न उत्तम प्रकारचें होतें.

तें अन्न वाढण्यापूर्वीं दहा-पांच मिनिटें "रघुपतिराघव राजाराम पतीतपावन सीताराम" या महामंत्राचा जप ते दीनदुबळे लोक मोठ्या उत्साहानें व आनंदानें करतात.

हें दृश्य पाहून मनस्वी आल्हाद झाला, आणि श्री गोधडेबुवांच्या एकंदर सर्व चमत्कृतीचें आश्चर्य वाटलें.

या सर्व इमारती बांधतांना वर्गणी देणारांचीं नांवें आणि त्यांच्या देणग्या मोठमोठ्या तक्त्यांवर नोंदलेलीं आहेत, त्यांचा तपशील पाहतां किती तरी अनेकपटीनें खर्च झाला आहे, आणि बिनबोभाट चालत आहे. अत्यंत गरीबांच्या ठिकाणीं निस्सीम प्रेम, आस्था, तसेंच त्यांच्या सद्गतिसाठीं उत्कंठा; इतर साधारण मनुष्यांसाठीं सर्व प्रकारची सोई जी कदाचित् त्यांच्या स्वतःच्या राहत्या घरीं मिळत असेल याची वानवा; आणि हें सर्व एखाद्या सुयंत्राप्रमाणें अहर्निश चालावें अशी योजना, हें कांहीं लहानसहान काम नाहीं. माझ्यासारख्या पामराच्या अकलेबाहेरची ही गोष्ट आहे. माझी मति गुंग झाली.

श्रीशिरडीच्या जाडया जाडया व्यवस्थापकांनी एकदां तरी श्रीपंढरीस जाऊन लहान पोरांसाठी ही केलेली व्यवस्था अवश्य पहावी अशी त्यांना नम्र विनंत आहे.

या धर्मशाळेप्रमाणें श्रीगोधडेबुवानीं महार आणि परीटांसाठीं दोन निरनिराळ्या पण विस्तीर्ण अशा बैठ्या बांधणीच्या धर्मशाळा बांधल्या आहेत, त्या पण पाहिल्या. त्यांची टापटीप, स्वच्छता वगैरे सर्व व्यवस्था पाहून अत्यंत आश्चर्य चकित झालों.
श्रीतुकोबारायांच्या अभंगाची आठवण झाली.

जे कां रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ।
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ।
ज्यासि आपंगिता नाहीं । त्यासी धरी जो ह्रदयीं ।
दया करि जे पुत्रासीं । तेचि दासां आणि दासीं ।
तुका म्हणे सांगों किती । तेचि भगवंताची मूर्ति ॥ १ ॥

तेथून पंढरीचें अनाथ आश्रम पाहिलें. ज्याविषयी पुढील एखाद्या अंकांत लेख येईल.

नंतर श्री दासगणूंच्या मठीकडे गेलों, व त्यांची भेट घेतली. त्यांनी अत्यंत प्रेमानें आदरातिथ्य केलें. त्यांच्या मठींत श्री साईबाबांचा एक पूर्व-कालिन् मनोवेधक चेहरा आहे. त्याची तशीच दुसरी प्रत कै. नानासाहेब चांदोरकरांच्या घरीं आहे.

श्री दासगणुंचा निरोप घेऊन श्री गोपाळपुऱ्यास गेलों. तिकडच्या देवालयांच्या एकंदर भक्कम बांधणीवरून कदाचित् या देवाल्यावर अनागोंदीच्या राजानें हल्ला करून त्याच्या मधल्या श्रीविठ्ठलाला त्यानें तिकडून पळवलें असावें असें वाटलें. या विषयीं पुरातन वस्तुसंशोधनवेत्ते विशेष विस्तृत व साधार माहिती देऊं शकतील.

तेथें जनाबाईचें भुयार दाखवितात. त्यांत श्री विठ्ठल व जनाबाईच्या मूर्ती आहेत. कांहीं जुने कपडे आहेत, त्यांना जनाबाईची गोधडी

म्हणतात. हे कपडे अलिकडचे दिसतात. शिवाय त्यावेळेचे कपडे इतकीं वर्षे अशा उघडया हवेवर टिकणें अशक्य कोटींतलें आहे. जनाबाई बापडी, देवाची लाडकी जनी, जिनें देवाला " देव भावाचा लंपट " अशा सलगीनें संबोधावें, तिला अशा भव्य ठिकाणी राहाण्यास ठिकाण मिळावें हें अशक्य! ती बापडी गरीब नामदेव शिंप्याच्या आंगणांत त्याची बटीक म्हणून एका कोपऱ्यांतल्या झोंपडीत राहत होती, हे सर्वांना ठाऊक आहे.

कदाचित् या भुयारांतून त्या धामधुमीच्या काळीं किल्ल्याबाहेर पडण्यासाठीं अथवा किल्ल्यांतल्या भांडाराकडे अथवा कोठी वगैरे धान्यागाराच्या संग्रहस्थानाकडे जाण्याचा मा[illegible] असावा जो मागाहून लिंपण्यांत आला असावा.

या गोपाळपुऱ्याच्या भव्य इमारतीविषयीं इतिहास व पुरातन वस्तु संशोधक गृहस्थांनीं, साधारपूर्वक माहिती जरूर पुरवावी.

स्थान अत्यंत रमणीय आहे. यात्रेकरूंनी तें अवश्य पाहावें. या शिवाय श्री पंढरींत अनेक प्रेक्षणीय स्थळें असलीं पाहिजेत. जीं पुढेंमागें पाहाण्याचा प्रसंग आल्यास त्याविषयीं आनंदानें उल्लेख होईल.

इतकें विस्तारानें लिहिण्याचें मुख्य प्रयोजन हेंच कीं श्रीविठ्ठलराय आमच्या महाराष्ट्रीय संतांच्या युनिव्हर्सिटीचे मुख्य चान्सेलर आहेत ही गोष्ट निर्विवाद आहे, आणि त्यांचें प्रत्यक्ष दर्शन झाल्याखेरीज श्रीनामदेव तुकारामादि संतांच्या श्रीविठ्ठलासंबंधींच्या बहुतेक प्रेमळ काव्यांच्या गर्भीतार्थाचा उलगडा कालत्रयीं व्हावयाचा नाहीं.

या सर्व आत्मसाक्षात्कारी संतांनीं आपल्या अप्रतिम प्रेमयुक्त **विचारांनीं** या मूर्तीत अशी कांहीं स्फुर्ति म्हणा, जादु म्हणा, काय वाटेल तें म्हणा, अवर्णनीय शक्ति ओतप्रोत भरली आहे कीं, तिचा स्वल्पसा अनुभव घेऊन श्रीसद्गुरुसाई माऊलीच्या आश्वासनाची आठवण होऊन वारकरी पंथाचें खरें रहस्य दृष्टोत्पत्तीस आलें.

प्रतिवर्षी एकदां किंवा दोनदां वारी करण्याचा उघड हेतु हाच दिसतो कीं या मूर्तिच्या अवलोकनानें ती मनांत भरावी, ठसावी, रात्रंदिवस तिचा निदिध्यास, संतांच्या गुणवर्णनपर कवनानीं लागावा. आमच्यासारख्या केवळ अनभिज्ञ अशा मजूर लोकांस ती मूर्ति रात्रंदिवस कामकाज करतांना अंत:चक्षूंपुढें दिसावी; आणि संसाराची सर्व प्रकारची भिस्त तिच्या ठायीं ठेवण्याची निष्ठा उत्पन्न व्हावी. दर वर्षांची वारी करून हें करण्याचें स्वाभाविक रीतीनें मनांत ठसत जावें, आणि त्यामुळें तन्मयता व त्यापुढली स्थिति आत्मसाक्षात्कार, हीं प्राप्त व्हावी, मग त्या मनुष्याला आणखी मिळवावयाचें तें काय राहिलें ! देवाला हृदयांत पक्का कोंडून ठेवणाऱ्या मनुष्याला आंत बाहेर सर्व ठिकाणीं सर्वांमध्यें आत्मस्वरूप दृग्गोचर व्हावयाचेंच. त्यानंतर त्याच्या स्वेच्छेप्रमाणें जनसमुदायासाठीं योजिलेल्या गोष्टी, सर्वशक्तिमान, अंतर्बाह्य सर्वव्यापी हृदयस्थ प्रभूस फलद्रूप करण्यास गरज पडतेच पडतें हें आपण पाहत आहोंत.

असो ! ओघानें लेखणी वाहवत चालली तिला आळा घालून आणि सूज्ञ वाचकांची या अतिप्रसंगामुळें क्षमा मागून पुढील हकीकत सांगतों.

त्या दिवशीं संध्याकाळीं ५--३० वाजतां पंढरपूर सोडून ७--३० वाजतां कुर्डुवाडीस आलों, आणि श्रीआजरेकरांच्या मित्रमंडळीसोबत श्रीराममंदीर पाहावयास गेलों.

मंदीर साधें पण सुबक बांधलेलें आहे. श्रीरामचंद्र, सीतामाउली, आणि श्रीलक्ष्मण यांच्या मूर्ती अलिकडील घडणीच्या सुंदर व मोहक आहेत. विस्तीर्ण सभामंडपाच्या सन्मुख श्रीवलभीम अखंड सेवेंत हजर आहेत.

हें स्थळ व आजूबाजूचा बगीचा पाहून मनास समाधान वाटलें. ही सर्व मंडळी विद्वान व आधुनिक पाश्चात्य शास्त्रप्रविण (Scientific) कामकरू व होतकरू, तसेंच निरनिराळ्या प्रांतांतली, निरनिराळी भाषा

बोलणारी अशी पांच ठिकाणची असून आचारविचारांनी अत्यंत थोर मनाची आहे.

पाश्चात्य संस्कृतीचा छाप असूनही याप्रमाणें साधारण जनसमुदायाला भक्तिमार्गाला लावण्याची वर लिहिल्याप्रमाणें आपली प्रेक्षणीय पद्धत टाकून न देतां तिचें संगोपन या प्रमाणें करून, श्रीपंढरीरायाच्या दर्शनाला जाणाऱ्या मार्गाच्या ऐन कोनावर हें सुंदर मंदीर बांधून देवाच्या पूजेअर्चेची सुव्यवस्था लावून, भक्तिमार्गाची ही मक्कम मेढ त्यांनी रोंविली आहे. हें देवालय पंढरीस जाणाऱ्या यात्रेकरूंनी जरूर पहावें अशी त्यांना नम्र विनंति लेखक करीत आहे.

श्रीसाईमाउलीचे बालगोपाल कसकसे व कोठें कोठें आपल्या गुरुमाउलीचा बोध मनांत खास ठसावून जनतेला पाश्चात्य शिकवणीच्या निराशारूपी अनैश्वर्यवादी भावनांच्या भयंकर खोल भोवऱ्यांतून सुखरूप बाहेर काढून संतांच्या शिकवणींकडे लक्ष देऊन तिच्यांत सन्मार्गाकडे लावण्याची स्फुर्ति कशी उत्पन्न करवीत आहेत याचें हें प्रत्यक्ष दृश्य पाहून हृदय भरून आलें.

या सर्व गोड ंडळीचा व प्रेमळ स्टेशन मास्तरांचा निरोप घेऊन सोमवारीं सकाळीं मुंबईस आलों. यत्किंचित्‌ही त्रास झाला नाही.

बलिप्रतिपदा,
शके १८५३.

"म्हातारा"

# अनुभव

श्रीसाईनाथ महाराज की जय ! श्रीसद्गुरु प्रसन्न ! श्रीसमर्थांच्या कृपेनें माझा जन्म चांगल्या कुळांत झाला; आणि त्यांच्याच कृपेनें एका गरीब पण सच्छील कुटुंबांत माझा संबंध जडला. माझी लहानपणापासून ईश्वरावर भक्ति, तेव्हां थोड्याच दिवसांनी मला हे सद्गुरूचे पाय दिसले. तेव्हांपासून माझा भार माझ्या ह्या अत्यंत कनवाळु कृपाळू साईबापावर आहे. माझ्या गेल्या जन्माच्या संचित कर्मानें, मला ज्या कांहीं वाईट गोष्टी गेल्या त्याबद्दल माझे बाबा काय करणार ! मी वाईट कर्म करून बाबांना संकटांत कशाला ठेवा ! परंतु ही माझी सद्गुरुनाथ माऊली नेहमी माझ्यावर कृपेची साउली करीत असते. मला या संसारसागरांतल्या लाटांनीं अगदी हैराण केलें आहे, परंतु माझ्या माऊलीनें त्या लाटा तोडून टाकण्याचा नियम केला आहे. हरएक शब्दानें मनाला आनंद न होतां त्रासानें जीवाचा कंटाळा येतो, परंतु समर्थांच्या नावानें मनाला एक-प्रकारचा अल्हाद होतो व संकट निरसन होतें. असे हे महासाधु ईश्वर लीलाधारी, भक्तासाठीं अवतारी, त्यांच्या चरणांची नेहमी भक्तानीं आठवण करून स्मरणजागृति ठेवावी.

ह्या भक्तिरूपी दात्यानें आपल्या भक्तांचें संकटांत कसें रक्षण केलें आहे ते पहा. पुढील अनुभव माझ्या परिचयांतलेच असल्यामुळें ते येथें देत आहें:—

१ एका भक्तिवान बाईवर असा प्रसंग आला कीं, तिच्या पतीची वेळ-घटका भरली, तेव्हां त्या बाईनें बाबांची प्रार्थना केली की, तुझ्या दर्शनासाठीं मी पायी येईन, पतीला बरें कर. त्याप्रमाणें तिचा पती बरा होऊन तो दुखण्यांतून उठला. तेव्हां ती साधुदर्शनासाठीं निघाली. तेव्हां बाबानीं स्वप्नांत दर्शन देऊन दृष्टांत दिला कीं, श्री गंगेचे (गोदावरीचे) [illegible]टीं मंदिराचे कळसांत बाबा बसले आहेत आणि तिला " बाई ! तुझा

नवस मला पोंचला. तूं कष्टी होऊं नकोस, आणि पायीं मार्ग क्रमूं नकोस" असे ते करुणापूर्वक शब्दांनी बोलले.

या गोष्टीला १५।१६ वर्षें झालीं. श्रीगुरुपूर्णिमेची वेळ होती. रस्त्यांत इतरांना हरएक संकटें आलीं,गाडीचीं चाकें मोडलीं, कोणी पडले, कोणास ताप, कोणास वाखा, कोणाचे हातपाय सुजले आणि कोणी आगगाडीखालीं देखील आले. अशा सर्व संकटांतून श्रीसाईबाबांनीं त्या बाईवर रक्षणाचें सुदर्शन ठेविलें होतें.

त्या नंतर दरसालीं दरमहिन्याला त्या गरीब बाईवर नाना तऱ्हेचे प्रसंग येत असत, त्यांतून तिला हे कनवाळु बाबा पार पाडीत असत. बाबा, माझे ताता, 'देहातें होते तोंपर्यंत ज्या भक्तानें धांवा केला त्या त्या भक्ताकडे धांव घेत असत.'[1]

२ एक वयातीत बाई फार सीक होती. डॉक्टरांचा उपाय हटला, तेव्हां बाबांच्या जवळ एका भक्तानें चरणतीर्थ मागून घेतले, व तें तीर्थ आणून त्या बाईस प्राशन करण्यास दिले. दुसऱ्या दिवसापासून त्या वयातीत बाईस गुण आला. जवळ असणाऱ्या बाईस बाबांनी तिथें जाऊन आपलें स्वरूप दाखवून सीक असणाऱ्या बाईस उपचार करीत आहे असें दर्शविलें.

३ तसेंच एका बाईस बाबांनीं स्वप्नांत जाऊन दक्षणा मागून तिला मंत्रोपदेश सांगितला.

४ एका भक्ताच्या घरीं हरिकीर्तन करीत आहेत असें दर्शविलें.

५ एका वेळीं असें घडून आलें कीं, एक बाई आपल्या लहान लहान मुलांबाळांना घेऊन व जवळ ५-६ हजारांचा माल घेऊन नोकर (हमाल) घेऊन आगगाडीतून जाण्यास निघाली. मुंबईतल्या लबाड

---

१ देह सोडल्यांला आज लगबग १३ वर्षे झाली तरी श्री साईमाऊली हीच प्रचीति सध्यां देखील दाखवीत आहे.—संपादक.

लोकांची गर्दी. त्यांत तिच्यावर कसा प्रसंग गुदरला तो पहा! ती बाई बाहेरगांवच्या आपल्या नातेवाइकांकडे जाण्यास निघाली. स्टेशनवर आली तेव्हां तिची कांहीं लहान मुलें आगगाडींत बसली. व हमालाच्या जवळ पांच-सहा हजारांचा माल घेऊन तो बसला. इतक्यांत गाडी चालू झाली. ही बाई स्टेशनवर ओरडत बसली व धैर्यानें गार्डाला म्हणाली माझीं मनुष्यें अमूक स्टेशनवर उतरवा. त्या बाईनें आपल्या सद्‌गुरूचें स्मरण करून धांवा केला. "बाबा! या संकटांतून कोण काढणार? माझीं दोन लहान मुलें कोठें जातील व कोण त्यांना उतरवील? मी हा माल दुसऱ्याचा आणला तेव्हां तो हमाल कोठें जाईल व काय करील? त्याचा नेम काय? तिकीटा तर मजजवळ आहेत! तेव्हां तूं समर्था, त्यांचेसाठीं धांवत जाऊन त्यांचें व माझें संरक्षण कर!"

बाबा कनवाळु, कृपाळु, भक्तांचें संकट निरसन करण्यासाठीं, त्यांनीं आगगाडींत धांव घेतली. व ज्या डब्यांत तीं लेकरें बसलीं होतीं तेथील बसणाऱ्या बापानें त्या मुलांची चवकशी करून जेथें उतरण्याचीं होतीं तेथें उतरवून व जो हमाल माल घेऊन बसला होता त्याचे मनांत पूज्यभाव उत्पन्न करवून तोही तेथें उतरून त्या गोजिरवाण्या मुलांना घेऊन जेथें जावयाचें होतें तेथें गेला. ही बाई आपल्या बाबांवर पूर्ण भरंवसा ठेवून दुसऱ्या गाडीनें गेली. तेथें स्टेशनवर तिची मंडळी दिसली नाहीं. त्यांत ती जास्त घाबरून गेली. शेवटीं तिकीट घेणाऱ्या मनुष्याला विचारून खुणा घेऊन तेथें गेली. जेव्हां ती मंडळी तेथें सुखरूपपणें आहेत हें पाहून महाराजांना अतिशय विनवून आनंद पावली.

असे हे महाअवतारी साईनाथ, सहाय्य करणारे तात, ते ह्या दीन अबला मुलीवर नेहमी दृष्टी ठेवोत असें अति करूण वाणीनें, पूज्य बुद्धीनें मी त्यांचेजवळ हेंच मागून माझा लेख पुरा करितें. सर्व भक्तांनी ह्या साधु-रूपी ईश्वराची जितकी भक्ति केली तितकी थोडीच आहे. भक्तांच्या पाप-

पुण्याईने त्यांच्यावर संकटें तर येतात, परंतु आपण ह्या ईश्वराला उगाच दोष न द्यावा. जरी आपणापांसून पैशानें मदत झाली नाहीं, व शरीरानें सुद्धां झाली नाहीं, तथापि भक्तिनें, मनानें करून त्यांना शरण रिघावें कीं, तेच आपणाला मदत करतील !

असो. हा लेख भक्तांच्या आग्रहानें मी वेडावांकडा लिहिला तो माझ्या भक्तबंधूनें सुधारून घ्यावा. आणखी वेळाअंतीं त्यांचे चमत्कार कळवून श्रीसाई महाराज की जय म्हणून लेख पुरा करितें. त्यांचें विश्रांतिस्थान पाहाण्याची इच्छा करितें

आपली एक गरीब

**भगिनी.**

लेखिकेने लिहिलेला हा प्रेमळ लेख जशाच्या तसाच प्रसिद्ध करण्यांत येत आहे, त्यांत काहीइतकाही फेरफार करण्याचें धाडस होत नाहीं.

वांद्रें,
ता. २ दिसेंबर.

संपादक,
**रा. आ. तर्खड.**

# अनुभव

आज ता. ११ ऑक्टोबर १९३१ रोजी एक सन्माननीय मित्र श्रीपुण्यतिथीची व त्रैमासिक वर्गणी भरण्यासाठीं घरीं आले होते, त्यांनीं श्रीसाईमाउलीविषयीं स्वतःच्या अनुभवाची एक गोष्ट सांगितली. ती येणें-प्रमाणें:—

" मी सन १९१५ च्या गुरुपूर्णिमेस श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठीं प्रथम गेलों होतों. माझ्याबरोबर माझ्या परिचयाचे स्नेही होते."

" श्रींच्या पायां पडल्यानंतर त्यांच्या दरबारांत कठड्याबाहेर पड-वींत दूर बसलों. सर्व प्रकार पहात असतां मनांत विचार आला कीं, बाबा चिलीम ओढून आजूबाजूच्या मंडळीस ती ओढावयास देतात आणि मंडळी ती ओढते, तर आपणाला ती चिलाम ओढण्याचा सुयोग मिळेल काय ?"

" हा विचार माझ्या मनांत येतांक्षणींच बाबा मला म्हणाले 'दूर कां बसावं ? असं जवळ येऊन बसावं !" हे शब्द ऐकतांक्षणींच अत्यंत आनंद झाला. वर जाऊन श्रींच्या पायांजवळ बसून त्यांची सेवा करूं लागलों. तेव्हां त्यांनी चिलीम आपण स्वतः ओढून पुन्हा पुन्हा मला ओढ-ण्यास दिली. ही प्रचीति आल्यावर श्रींच्या पायीं श्रद्धा जडून घरीं परत आल्यावर श्रींची तसवीर देव्हाऱ्यांत मांडून तिची पूजा अर्चा करूं लागलों."

" बाबासाहेब ! आपण जाणत आहातच कीं मी एक मध्यम स्थितीतला गृहस्थ आहें. आपलं काम भलं की ऑफिसचं काम भलं ! नाही कुठं जाणं येणं किंवा कोणत्या संस्थेंत अथवा समाजांत सामील होणं ! तरी पण इतर मोठमोठे लोक करतात त्यांचं स्वाभाविक रीत्या अनुकरण करून माझे मित्र व मी संध्याकाळीं ब्रांडी सोडयाच्या पेयाचें सेवन करीत असूं ; कधीं कधीं त्यांत अरस परस आग्रह होऊन त्याचा अतिरेक होऊन घरीं आल्यावर जेवण खाण काय आणि कसलें असें होऊन दुसऱ्या दिवशीं तबियत हटकून बिघडावयाचीच; असें असूनही

हा आमचा हव्यास सुटला नाहींच. आमची शरीरें रोगी व ंगू होऊं लागलीं पण त्याची दरकार कोठें ! !"

"मला पक्कें स्मरतें कीं इ. स. १९१७ च्या फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या तारखेला पहांटेस मला स्वप्न पडलें कीं, साईबाबा मोठें थोरलें रूप धारण करून माझ्या छातीवर बसले आणि म्हणाले "पोरा ! हे तूं काय मांडलें आहेस ? पहा ! ही तुला पहिली सुचना देतों कीं, तूं दारू पिण्याचें सोडून दे, हें तूं न ऐकलेंस तर पुन्हा तुला सूचना देईन, ती पण जर न जुमानिलीस तर तुझें नशीब !'"

"मी धडपडून जागा झालों आणि श्रींच्या तसबिरीपुढें नमस्कार घालून शपथ वाहिली कीं, "बाबा ! यापुढें मी दारूला शिवणार नाहीं."

"माझ्या मित्रमंडळीला मी दारू पिण्याचें सोडल्याचें ऐकून व पाहून कौतुक वाटलें, आणि ती मी प्यावी म्हणून आपआपल्या परीनीं त्यांनीं पराकाष्टा केली, परंतु त्यांना त्यांत यश आलें नाहीं. विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, इतक्या वर्षांच्या संवईमुळें दारू पिण्याचा जो अनिवार्य मोह उत्पन्न व्हावयाचाच असें सांगतात, तसा मोह मला मुळींच झाला नाहीं. हें केवळ साईमाऊलीच्या कृपेचेंच फळ, असें मला खात्रीपूर्वक वाटतें."

"या प्रमाणें ंधरा दिवस गेले. त्याच महिन्याच्या पंधराव्या तारखेस आमच्या आफिसांत इलेक्ट्रिक लाईटच्या तारा वगैरे टाकून काम पुरें होऊन लाइटचें उद्‌घाटन व्हावयाचें होतें आणि त्याप्रमाणें संध्याकाळीं सर्व ठिकाणीं प्रकाश पडून सर्वांना आनंद झाला."

"आमच्या हपिसाचा साहेब त्याच घराच्या वरच्या मजल्यावर आपल्या मुलेलेकरांसहित राहात होता. त्याचे दोन मुलगे दुसऱ्याच दिवशीं पांचगणीच्या शाळेंत शिकण्यासाठीं त्या शाळेच्या बोर्डिंगांत राहावयाला जाणार होते. सबब त्यांच्या गमनाप्रीत्यर्थ शुभेच्छा प्रदर्शित करण्याकरितां व इलेक्ट्रिक प्रकाश आल्याच्या आनंदाकरितां आम्हा दोघा निवडक कारभाऱ्यांना साहेबानें आपल्या दिवाणखान्यांत वर नेलें."

"तेथें रिवाजाप्रमाणें व्हिस्की-ब्रँडीच्या व सोडयाच्या बाटल्या आणून प्रत्येकापुढें रिकामी ग्लासें ठेवून, ज्याच्या त्याच्या इच्छेप्रमाणें "Say when" (दारु ओततांना आपल्या इच्छेप्रमाणे ग्लासांत भरल्यावर, "Thank you that will do" ( आपले आभार आहेत, पुरे ) हे मंत्रोच्चार सुरू झाले. मी साहेबाला आग्रह न करण्याचें विनविलें, आणि सांगितलें कीं, दारू न पिण्याची शपथ वाहिली होती. साहेब म्हणाला कीं "आमच्यांत देखील अशा शपथा घेण्यांत येत असतात, परंतु त्या पाळतांना अशा शुभप्रसंगीं Taste (स्वाद घेणें ) केल्यानें शपथेला मुळींच बाध येत नाहीं असें आम्ही समजतों."

"मला तें कसेंसेंच वाटलें. माझ्या समोरचें दारूचें ग्लास पिण्याला मन घेईना; माझ्या मित्राने माझ्या मनांतला प्रकार जाणला. जरी तो देखील एक साईभक्त होता, तरी त्याला पिण्याचा विधिनिषेध नसल्या कारणानें त्यानें आपल्या पुढयांतील ग्लास गट्ट केला. साहेबानें आपला ग्लास तोंडाला लावला लावला व वर सांगितल्याप्रमाणें मला आग्रह केला. मी ग्लास उचलला. आतां काय करावें. साहेबाला वाईट वाटूं नये व आपल्या शपथेचा भंग होऊं नये हें व्हावें कसें या विवंचनेंत असतां एकाएकीं घरांतल्या सर्व बत्त्या गेल्या. तेव्हां मेन स्वीच ( म्हणजे मुख्य चावी ) पाशीं जाऊन कोणी खेळत असेल असें मानून साहेबानें आपल्या हातांतलें ग्लास टेबलावर ठेवलें आणि आम्हाला बसावयास सांगून अंधारांत चांचपडत तो दादर उतरून खालीं गेला."

"श्री साईमाऊली प्रसन्न झाली असें वाटून तें हातांतलें ग्लास टेबलाखालीं ओतण्याच्या तयारींत मी होतों; आणि तसें केलें असतां त्या टेबलाखालचें उंची जाजम खराब झालेंच असतें. रस्त्यापलीकडच्या घरांतून त्या खोलींत आलेल्या अंधुक प्रकाशामुळें माझ्या स्नेह्यानें माझ्या चर्येवरून मी काय करणार हें ताडलें आणि जाजम खराब न व्हावें या

सद्‌हेतूनें प्रेरित होऊन ते ग्लास माझ्या हातांतून झट्‌कन् घेऊन स्वतः गट्ट केलें. आणि माझ्यापुढें टेबलावर ठेवलें."

"इतक्यांत प्रकाश पुन्हा यऊन घरांतले सर्व दिवे पेटले. साहेब परत घर आला आणि म्हणाला ".मेन स्विच तर बरोबर होता आणि वत्त्या गेल्या कशा व पुन्हा पेटल्या कशा, हे कसें झालें याचा उलगडा होत नाहीं!"

"माझ्या पुढयांतला ग्लास रिकामा झालेला पाहून, आपला शब्द राखून आपल्या मुलांच्या गमनाला याप्रमाणें शुभेच्छा दर्शविलेली पाहून त्यानें माझे आभार मानले."

"आम्ही दोघेजण आपआपल्या घरीं गेलों. त्या रात्रीं बाबांनीं मला स्वप्नांत दर्शन दिलें. आनंदांत होते. आशीर्वाद दिला. मला पण आनंदाचें भरतें आलें. त्याचें वर्णन करणें अशक्य."

"त्या दिवसापासून दुखणें गेलें, शरीर सुधरलें, कुटुंबांतल्या सर्व माणसांच्या तोंडावर तजेला आला, सर्व प्रकारच्या सुखसोई घरांत जशा कांहीं आपण होऊन उत्पन्न झाल्या, आणि आनंद होऊन, संसार सुखांत. ठेवून माझी बायको थोडयाच वर्षांमागें आम्हा सर्वांस मागें ठेवून श्रींच्या चरणीं लीन झाली."

"बाबासाहेब! वर सांगितलेला प्रकार दुसऱ्या दिवशीं ऐकून माझ्या मित्राच्या मनावर जो परिणाम झाला तो आपल्याला ठाऊक आहेच. काय त्यांची आध्यात्मिक भरारी! श्री साईबाबांच्या भक्तांपैकी ते एक गुप्त रत्न आहेत हें आपण जाणत आहांच. नाहीं कांहीं गाजा वाजा! नाहीं कांहीं पसारा! आपण भले आणि आपली निष्ठा भली!"

"आपल्या गुरु माऊलीची लीला मी कोणत्या तोंडानें वर्णन करूं! दृष्टांत कोणाला! अलबत, त्यापासून माझें प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रीत्या कोट

कल्याण झालेंच पण त्या दृष्टांतापासून अध्यात्मिक उंच उडी कोणी मारली ! "

" हा संसारसागर तरून जाण्यासाठी बाबारूपि अप्रतिम नौकादंडाची कास आपल्यासारख्या सर्वांनी धरलीच पाहिजे. "

रा. आ. तर्खड,

संपादक--श्री साईलीला.

वरील हकीकत वाचून ज्या कुणाला दुर्दैवानें " पेग " घ्यावयाची संवय असेल त्यानें श्रींच्या चरणी मन लावून ती हानिकारक संवय सोडून द्यावी. श्री साईबाबा सर्व समर्थ आहेत आणि ही दुष्ट संवय सोडून देण्याला कशी काय प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष मदत करतील याचा जरूर अनुभव घ्यावा अशी त्यांना लेखकाची अत्यंत नम्र विनंति आहे.

वांद्रें, ता. ११.
अक्टोबर १९३१ }

—संपादक.

# अनुभव

रा. गणपतराव हे एक प्रसिद्ध परभू घराण्यातले गृहस्थ आहेत. खार ( श्री लक्ष्मीनगर ) येथें ते राहत आहेत. त्यांच्या कुटुंबातील लहान-थोर सर्व माणसें श्रद्धाळू व स्वधर्मपरायण आहेत.

सुमारें १७।१८ वर्षांमागें त्यांची कुटुंबीय व इतर स्नेही मंडळी मिळून २५।३० माणसें श्री साईबाबांच्या दर्शनासाठीं शिरडीस गेली होती. मे महिन्याचे ऐन उन्हाळ्याचे ते दिवस असल्यामुळें व केवळ कै. साठ्यांचाच वाडा त्यावेळीं उताऱ्यासाठीं असल्यामुळें त्यांचे बरेच हाल झाले होते.

अनेक साधुसंतांच्या तसविरी घरांत आहेत, त्यांत श्री साईबाबांची पण एक तसबीर आहे, तरी श्री साईबाबांची खास अशी पूजा त्यांच्या घरीं नाहीं, अशी वस्तुस्थिति त्यांच्या घरीं सध्यां आहे.

गेल्या मंगळवार ता. २० अक्टोबर रोजीं पहाटेस श्रीयुत गणपत-रावांना एक स्वप्न पडलें. त्यात एक आकृति त्यांच्या नजरेस पडली. या आकृतीचें स्पष्ट रूप त्यांना आठवत नाहीं, ती आकृति त्यांना म्हणाली “ अरे ! तूं चिंता कां करतोस ! शिरडीस जा ! तेथें साईबाबा मशिदींत बसला आहे त्याचे पाय घट्ट धर. तो तुझी मानसिक व शारीरिक आपत्ति दूर करील ! ”

गणपतराव त्या आकृतीला म्हणाले “ शिरडीस साईबाबा आहेत कोठें ! त्यांनीं तर केव्हांच समाधि घेतली आहे.” तेव्हां श्रीसाईबाबा प्रत्यक्ष प्रकट होऊन म्हणाले “ अरे ! शिरडीस मी मशिदींत बसलों आहें, गेलों नाहीं. मला येऊन भेट ! ” गणपतरावांनीं आनंदानें श्री साईबाबांपुढें लोटांगण घालून त्यांचें वंदन केलें.

पुढील हकीकत गणपतरावांच्या तोंडचीच येणेंप्रमाणें:—"इतक्यांत जागा झालों, पहाट झाली होती. बरें वाटलें. हळूहळू इतर मंडळी जागी झाली. मुखमार्जन करून स्वप्नाची हकीकत इतरांना सांगितली. कारण या प्रमाणें पडलेलीं स्वप्नें एकमेकांस सांगावयाची असा आमच्या घरेचा प्रघात आहे.

सर्वांनीं मला तावडतोब शिरडीस जाण्याचें सुचविलें. दुसऱ्या दिवशीं दसरा असून श्रीसाईबाबांची पुण्यतिथि आहे याची सर्वांना आठवण होऊन स्वप्नाचें कौतुक वाटलें. त्याच दिवशीं संध्याकाळीं जवळच रा. ब. मोरेश्वरराव प्रधान यांचे घरीं सान्ताक्रूझ येथें गेलों. तेथें त्यांच्या कुटुंबानें ते आदल्याच दिवशीं शिरडीस गेल्याचें कळविलें आणि त्या दिवशीं सुंदरराव नवलकर हे जावयाचे आहेत असें पण मला सांगितलें.

आतां संध्याकाळ होऊन रात्रीचा सुमार, अशा वेळीं मुंबईस जाऊन नवलकरांना त्रास द्यावा हें उचित वाटेना. मनाचें आंदोलन सारखें चाललें होतें कीं, जावें कीं न जावें. मला दम्याची व्यथा आहे. शिरडीचा लांबचा पल्ला पडला. त्यांत नदीला पूर आल्याचें समजलें, कुणाची सोबत पहावी तों मिळेना. अशा विवंचनेंत दुसरा म्हणजे बुधवारचा दिवस गेला. घरच्या मंडळीचा आग्रह पडला कीं शिरडीला जावेंच. तेव्हां मनाचा निर्धार करून गुरुवारीं सकाळीं अलाहाबाद एक्स्प्रेस पकडून, बारा वाजतां मनमाडाहून दौंडाकडे जाणारी गाडी मिळून, कोपरगांवास उतरून टांगा केला. टांगेवाल्यानें मला हैराण केलें. अड्ड्यावर टांगा सोडला. तेथून नदी दूर आहे. नदीला पूर आला होता. नाव चालू होती. तिच्यांत बसून पैलतीरास गेलों. तेथें मोटर मिळून वीस पंचवीस मिनिटांत शिरडीस श्री. प्रधान, सुंदरराव वगैरे मित्र मंडळीस भेटलों. स्नान केलें. समाधीचें दर्शन घेतलें. नंतर मशिदींत जाऊन श्रींच्या तसबिरीपुढें बसून सर्व सुख दुःखें निवेदन केलीं. ज्याचा त्याचा अनुभव हा त्याच्याच पाशीं असावयाचा; सांगून तो इतरांना कळणें कठीण. सारांश अत्यंत बरें वाटलें. नंतर सर्वांबरोबर भोजन झालें.

रात्री रथोत्सव होता. थोडे एकनाथी गारूड झाले. त्या रात्री दम्याचा जोर झाला. नंतर चांगली झोप लागली. दुसऱ्या दिवशी म्हणजे शुक्रवारी पुष्कळ हुशारी वाटली. शनिवारी सकाळी बैलगाडीतून मंडळी-बरोबर निघालों; मनमाड स्टेशनावर फराळ केला. दूध घ्यावयाची हिंमत होत नव्हती तें घ्यालों, आणि संध्याकाळी खार येथे घरी आलों. दम्याचा यत्किंचित् त्रास झाला नाहीं, शारीरिक व मानसिक हुषारी वाटत आहे. ही सर्व श्री साईबाबांच्याच कृपेची फळें आहेत यांत संशय नाही.

श्री गणपतराव हे अत्यंत मितस्त स्वभावाचे आहेत. आपला अनुभव प्रसिद्ध होऊन आपल्या नांवाचा निष्कारण गाजावाजा होऊं नये अशी त्यांची खास इच्छा असल्याकारणानें त्यांचें पूर्ण नांव येथे प्रसिद्ध करण्यांत येत नाहीं.

वांद्रें ता. २२ अक्टोबर १९३१.

—संपादक.

## शके १८५१ च्या श्री साईबाबा शिरडी संस्थानच्या श्री गुरुपौर्णिमेच्या जमाखर्चाचा तक्ता

**जमा**

| | |
|---|---|
| ५३।≡ । | श्रीसमर्थांचे पेटींपैकीं उत्पन्न |
| २६१।= ॥ | श्री भक्तमंडळीकडून आलेली वर्गणी. सोबत तपशीली यादी असे. |
| १४४८≈॥ | श्रीमंतकेशवराव गोपाळराव बुटी आणि बंधू यांचेकडून |
| ४६७-०-६ | |

**खर्च**

१०७।=। श्री मुदबक खर्च

१२ गहूं मण २

४४८¬। तांदूळ

२४ बारीक मण १

२०८¬। ठोकळ मण १८०

१८= डाळ तुरीची १० पायली

४।= दाळ छोल्याची ६॥

३ गहूं शेर १५

२२॥= साखऱ्या मण २८२

१२।≡। गूळ

१४॥ पत्रावळी व द्रोण

३३।८। तूप शेर

१३।=॥ तेल गोड डबा १

५।=॥ शाक भाजी

१०॥।¬॥ दूध, दहीं

.॥८। मीठ पायली ३॥

१॥= तूप शेर २

१ लवंग

२॥ काथ १ शेर

.॥¬ खोबरें २ शेर

८¬। आगपेटी

.॥¬ बदाम, खारीक

१८≡ किसमीस, दाणे

.।¬। विलायची, मोहरी, साबूदाणा

.।¬ मिरची, हळद

१०॥=। सरपण

१८¬। भोजन दक्षिणा

.॥¬। कपडा स्वयंपाकाकरितां

---

२०७।=।

खर्च

२०७।≈।

४॥≈॥ पूजेबद्दल खर्च

.।⁃ नारळ २

४≋ बुका

.॥ खडी साखर

.।. गुलाल

१।≈॥ चिल्लर पूजेचें सामान

२ देणें पूजाऱ्याला

४॥≈॥

८८।≈॥ मजूरी एकंदर

२१॥≋॥ सामान तयारी

४॥ गाडी भाडें.

७॥८। भिकार भोजनाबद्दल

५४।≈॥ पुरुषोत्तम आचारी

४० मेहनतीना

१४।≈॥ रेल्वे खर्च, मोटर खर्च

८८।≈॥

४३॥८॥ भक्तमंडळींना निमंत्रणपत्रिका व प्रसाद पाठविण्याबद्दल खर्च

७ पत्रिका छपाई खर्च

१३।⁃॥ पोस्टेज सदर

॥≋ प्रसादासाठी लेबलें

२२। प्रसाद पाठविण्याबद्दल व प्रसाद तयारी.

२॥ कपडा

१। पिशव्या शिलई

.।. धागा, रील

३८≈ साखर १० शेर

।≈ सुंठ

८≈ रद्दी कागद

१४॥≈ टपाल खर्च

४३॥८॥

खर्च

९०॥८। शिवाय खर्च

६० कीर्तनाबद्दल विश्वास बुवा यांस देणें

१५ व्यांबद्दल खर्च

८॥।~ रोषनाई खर्च

१॥।८॥। घोडयाकडे गवत, दाणा

५८=॥ भूयसी दक्षिणा वगैरे

९०॥।८।

४३५-०-६

खर्च

४३५८८॥

३२ श्री समर्थांचे समाधीकरितां पीतांबर खरेदी,

४६७८८॥

## श्रीसाईबाबा प्रसन्न

श्रीसाईबाबा शिरडी संस्थानचे तहाहयात ट्रस्टी व शके १८५२ मध्यें तीन वर्षांकरितां निवडून आलेलें सभासदांचें कार्यकारी मंडळ.


राव बहादूर मोरेश्वर विश्वनाथ प्रधान ट्रस्टी

,, ,, सखाराम बळवंत धुमाळ ,,

रावसाहेब बाळकृष्ण विश्वनाथ देव ,,

श्रीयुत तात्याजी गणपत पाटील कोते ,,

,, वासुदेव नारायण चांदोरकर ,,

ह. भ. प. दासगणू अध्यक्ष

श्रीयुत सुंदरराव दीनानाथ नवलकर आ. चिटणीस

,, बापुराव राघवजी बोरावके आ. दुय्यम चिटणीस

,, रामचंद्र आत्माराम तर्खड आ. खजिनदार

,, रघुवीर भास्कर पुरंदरे आ. दुय्यम खजिनदार

श्रीमंत केशवराव गोपाळराव बुटि

श्रीयुत यशवंत जनार्दन गाळवणकर

,, गोविंद काशीनाथ गाडगीळ

,, माधवराव बळवंत देशपांडे

,, वसंतराव नारायण गोरक्षकर.


## श्री साईभक्तांस विनंति

श्री साईभक्तांस सप्रेम विनंति करण्यांत येत आहे कीं, पुष्कळ पत्त्यांत फेरफार झाल्यामुळें त्यांना पोस्टांतून पाठविलेल्या उत्सवाच्या निमंत्रणपत्रिका व प्रसाद न पोंचतां परत येतात, तर कृपा करून त्यांनीं आपले पत्ते फेरबदल झाल्यास आम्हांस कळवावे.

**सुंदरराव दिनानाथ नवलकर,**

आ. चिटणीस,

श्री साईबाबा शिरडी संस्थान.

# अहल्योद्धार

अहल्योद्धार हें प्रकरण वाल्मीकि रामायण, अध्यात्म रामायण, आनंद, रामायण, वेद व महाभारत इत्यादि ग्रंथांतून वर्णन केलें आहे. त्या प्रत्येक ग्रंथांतील कथानक सारांशरूपानें देऊन नंतर त्याचा ऐतिहासिकदृष्ट्या विचार करूं. प्रथम वाल्मीकि या प्रकरणासंबंधानें काय म्हणतात तें पाहूं.

श्री रामचंद्र विश्वामित्राबरोबर गेल्यावर त्याच्या यज्ञांत विघ्न करणाऱ्या राक्षसांचा संहार करून अयोध्येस परत जाण्याची आज्ञा मागूं लागले, तेव्हां त्या आश्रमांतील सर्व ऋषि म्हणाले, "मैथिलस्य नरश्रेष्ठ जनकस्य भविष्यति यज्ञः परमधर्मिष्ठस्तस्य यास्यामहेवयम् ॥ ६ ॥" त्वंचैव नरशार्दूल सहास्माभिर्गमिष्यसि ॥ अद्भुतं च धनूरत्नं तत्रत्वंद्रष्टु मर्हसि ॥ ७ ॥ ( वा. रा. १।३१) असें सांगून ते सर्व ऋषि निघाले. व त्यांच्याबरोबर श्रीरामही निघाले. मार्गांत त्यांना गंगा ( भागीरथी ) नदी लागली. त्या वेळेस श्रीरामानें गंगोत्पत्तीबद्दल प्रश्न केला व विश्वामित्रानें ती सांगितली. असें लिहिलें.* आहे. रात्रीं त्या नदीवर मुक्काम केल्यावर दुसरे दिवशीं ते सर्व गंगा नदी उतरून पलीकडे गेले. तेव्हां मार्गांत त्यांना विशाला नगरी लागली. त्या नगरीची माहिती करून दिल्यावर विश्वामित्र पुढें चालले. तों त्यांना मिथिला नगरीच्या जवळ असलेला गौतमाचा आश्रम दिसला. हा आश्रम मिथिला नगरीच्या जवळ असलेल्या बगीच्यांत होता असें "मिथिलोपवने तत्र आश्रमं दृश्य राघवः (वा. रा. १।४८।११, ह्या वचनावरून समजतें. तो आश्रम पाहून श्रीरामानें त्याची माहिती विचारली व विश्वामित्रांनीं ती सांगितली. नंतर रामलक्ष्मणांनीं आश्रमांत जाऊन तपश्चर्या करीत असलेल्या दिव्यदेहधारी अहल्येला नमस्कार केला व तिनेंही निष्कामबुद्धीनें श्रीरामाचा सत्कार केला.× नंतर जिनें एक

---

* हें प्रकरण प्रक्षिप्त आहे. गंगावतरण पाहा.

× गौतमाचा वेष घेऊन इंद्र आला हें जाणून अहल्या त्याच्यावर आसक्त झाली॥ व त्याच्याशीं ती रममाण झाली. हें जाणून गौतम अहल्येस म्हणाला, ' यदात्वेतद्वनं घोरं रामोदशरथात्मजः । आगमिष्यति दुर्धर्षस्तदापूता भविष्यसि ॥ ३१ ॥ तस्यातिथ्येन दुर्वृत्ते लोभ मोह विवर्जिता। मत्सकाशं मुदायुक्ता स्ववपुर्धार यिष्यसि ॥ ३२ ॥

वेळ दुराचरण केलें, पण त्याच्या निरसनार्थ पतीची आज्ञा पाळून कडक तपश्चर्या केली ती त्या तपश्चर्येनें शुद्ध झाली व सौंदर्यवान श्रीरामाला पाहूनही जिची मति चंचल झाली नाहीं ती खरोखर पवित्र आहे असें मानून श्रीरामांनी तिच्या आतिथ्याचा स्वीकार केला. अर्थात श्रीरामांनीं तिचा उद्धार × केला. हें समजतांच गौतम आले व त्यांनीं श्रीरामाला मेजवानी करून अहल्येचा स्वीकार केला व नंतर रामलक्ष्मण विश्वामित्रासह मिथिला नगरीकडे निघून गेले.

---

×भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोशामध्यें ( वा. रा. बा. कां. स. ४८ व ४९ मध्यें व उ. कां. स. ३० चा दाखला देऊन ) लिहिलें आहे कीं, " गौतमानें अहल्येस शिला हो," असा शाप दिला व तिनें उःशाप मागितल्यावरून त्यानें दाशरथी रामाच्या पदरजःकणानें पूर्ववत् होशील असा तिला वर दिला. याप्रमाणें हिचा पुढें उद्धार झाला. " ( भा. व. प्रा. ऐ. कोश पान ३४ अहल्या श. पहा. ) पण हें सपशेल खोटें आहे. बालकांडांत कोशकारानें लिहिलेल्या कथानकाचा पत्ता नाहीं. उलट या कथेवर ' पुराणादिप्रसिद्ध शिलारूपप्राप्ति शापस्तुकल्पांतरेण ' अशी टीका आहे. अर्थात् शिला झाल्याची गोष्ट वाल्मीकींत नसून ती इतर पुराणांत आहे असें म्हणून ' शापदग्धापुराभर्त्रा रामशक्रापराधतः । अहल्याख्या शिलाजज्ञे शतलिंगः कृतस्वराट् ' हें पद्य पुराणांतील वचन दिलें. ( वा. रा. १-४८-३० वरील टीका पहा. ) ह्यावरून अहल्या शिला झाली हें वा. रा. बालकांडांत नाहीं हें सिद्ध झालें. आतां उत्तर कांडांत काय आहे तें पाहा. इंद्रजितानें इंद्राचा पराभव केल्यावर इंद्र निस्तेज झाला. तेव्हां ब्रह्मदेव त्याला म्हणाला,-" पूर्वीं त्वां गौतमाच्या स्त्रियेचें पातिव्रत्य भ्रष्ट केलेंस त्या वेळेस गौतमानें ' ज्या अर्थीं तूं निःशंकपणें माझ्या पत्नीचा उपभोग घेतलास त्या अर्थीं तूं समरांगणामध्यें शत्रूच्या हस्तगत होशील आणि हे दुर्बुद्धे, त्वां जें हें पापकर्म जगतामध्यें प्रवृत्त केलें तें मनुष्यलोकामध्यें सुरू होईल. ( कारण ' यद्यदाचरति श्रेष्ठ स्तत्तदेवेतरोजनः । सयत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनु वर्तते ' ) असें वचन आहे. व त्या लोकामध्यें जो जारकर्म करील त्याचें अर्धें पातक तो भोगील व अर्धें तुला भोगावें लागेल, व या पापकर्मामुळें तुझें इंद्रपद स्थिर राहाणार नाहीं. ' असा तुला शाप दिला. आणि ' ज्या अर्थीं रूप व यौवन ह्यांनीं संपन्न असलेली तूं स्थिर राहिली नाहींस त्या अर्थीं जगतामध्यें तूं एकटीच रूपवती राहाणार नाहींस. सर्वही प्रजा तुझें रूप वाटून घेतील. ' ( अर्थात् त्या योगानें तुझें सौंदर्य कमी होईल. ) असा

ह्याप्रमाणें वाल्मीकींत हकीकत आहे. आतां याच प्रकारासंबंधानें अध्यात्म रामायणकार काय म्हणतात तें पाहा.

श्रीरामचंद्र विश्वामित्रासह मिथिलानगरीस जात असतां मार्गांत त्यांना गंगानदी लागली असें अध्यात्मांत लिहिलें. ती नदी तरून जातेसमयीं श्रीराम नावेंत बसत असतां नावाडी म्हणाला, "रामा, 'क्षालयामि तवपादपंकजंनाथ दृषदोः किमंतरम् ॥ मानुषी करण चूर्ण मस्तिते पादयोरिति कथा प्रतीयसि ॥' (अ. रा. १।६।३) असें म्हणण्याला आधार काय तर 'दुष्टेत्वं तिष्ठ दुर्वृत्ते शिलाया-माश्रमे मम' हें त्याच रामायणांतील वचन कोणी कोणी पुढें आणतात. ( अ. रा. १।५।२७ ) पण ह्या वचनांत 'शिला हो' असें लिहिलें नाहीं. माझ्या आश्रमांत दगडावर बसली राहा अथवा जहल्लक्षणेनें 'गंगायां घोषः' या उदाहरणाप्रमाणें दगडाजवळ राहा असा त्या वाक्याचा अर्थ होतो. जर दगड हो असा गौतमांनीं शाप दिला असता तर 'निराहारा दिवारात्रंतपः परममा-स्थिता ॥ आतपानिल वर्षादिसहिष्णुः परमेश्वरम् ॥ ध्यायन्ती राममेकाग्रमन-

---

त्यानें अहल्येस शाप दिला. तेव्हांपासून पुष्कळ स्त्रिया रूपसंपन्न होऊं लागल्या. अहल्येला शाप दिल्यावर ती म्हणाली, 'हें विप्र देवानें आपलें रूप धारण केलेलें मला न समजल्यामुळें त्यानें माझा उपभोग घेतला. माझ्या इच्छेनें त्याला उपभोग घडला नाहीं. म्हणून आपण मजवर कृपा करावी.' असें तिनें म्हटल्यावर 'इक्ष्वाकुवंशामध्यें महातेजस्वी राम उत्पन्न होईल. तो मनुष्यरूप धारण केलेला विष्णु ब्राह्मणाकरितां रानामध्यें येईल. त्याचें आदरातिथ्य तूं करशील तेव्हां त्याचे दर्शनानें तूं पवित्र होऊन माझ्या समीप येशील.' ह्याप्रमाणें बोलून तो तपास निघून गेला. व ती तेथें फारच मोठें तप करूं लागली. सारांश, "अशा पापामुळें तुला असें दुःख भोगावें लागलें. याकरितां तूं आतां वैष्णव याग कर म्हणजे पापमुक्त होशील." असें त्या महादेवानें इंद्रास सांगितलें. ( वा. रा. उ. कां. स. ३१ ) ह्यांतही 'दगड हो' असा गौतमानें अहल्येस शाप दिला हें लिहिलें नाहीं व रामानें दगडाची स्त्री केली नाहीं. अर्थात् भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोशकारानें जें लिहिलें तें चूक आहे, असें म्हणणें भाग पडतें.

साहदि ॥" अ. रा. १।५।२८।२९ असें गौतमानें म्हटलें नसतें. कारण हें आज्ञापालन व्रत दगड करूं शकत नाहीं; शिवाय गौतम रागावला तेव्हां अहल्या कुटींत होती. तेथें उष्णता व जल यांचा संपर्क होणें संभवत नाहीं. कदाचित तिला कुटीच्या बाहेर बोलावून त्यानें तिला दगड केलें अशी कल्पना करून अध्यात्माची बाजू सांवरून धरली तरी गौतमाच्या आश्रमाच्या पलीकडे गंगानदी मुळींच नाहीं असें वाल्मीकीवरून दिसतें व अनुभवही × तसाच आहे; परंतु रामायण कालानंतर तीन हजार वर्षांनीं म्हणजे इ. स. सातवें शतकांत तयार झालेल्या अध्यात्म रामायणकाराला श्रीरामाच्या अंगीं कर्तुम्-कर्तुंअन्यथा कर्तुम् ही शक्ति आहे हें दाखवून ते विष्णूच होत असें आरंभा-पासून वर्णन केल्यामुळें त्यांच्या अंगीं अद्भुत सामर्थ्य लावलें व त्याचाच अनु-वाद इतर* कवींनीं केला; पण हें वर्णन ऐतिहासिकदृष्ट्या असत्य ठरतें.

---

× काशीनिवासी वीरराघवाचार्य रामानुजी हे मिथिलेस जाऊन आलेले सांगतात कीं, गौतमाचा आश्रम हिमालयाच्या पायथ्याशीं आहे. ( वास्तविक हा शिवालिक पहाड होय. ) गौतमाचा आश्रम व मिथिला यांच्यामध्यें गंगा नदी नाहीं. अर्थात् अध्यात्मांतील कोळयाचा प्रसंग चूक आहे.

*तुलसीदासानें बहुतेक कथाभाग अध्यात्मावरून घेतला असें रामेश्वर भट्ट तुलसीकृत रामायणाच्या भूमिकेंत लिहितात. ( तु. ए. भू. पा. ९ नि. सा. प्रे. प्र. ) त्या रामायणांत अध्यात्माप्रमाणें अहल्योद्धार झाल्यावर 'चले राम लक्ष्मण मुनिसंगा। गए जहांजग पावनि गंगा' असें लिहून जें प्रक्षिप्त कथानक अहल्योद्धाराच्या पूर्वी वाल्मीकींत लिहिलें तोच कथा प्रसंग 'चले राम' या चौपाईचे नंतर वर्णन केला; पण तो तुलसीकृत नव्हे क्षेपक आहे असें तेथें लिहिलें; पण तेथेंही नावाड्याची गोष्ट लिहिली नाहीं. आमच्या मतें क्षेपकाच्या पूर्वीची चौपाई 'चले रामलक्ष्मण' व शेवटली 'तव प्रभु ऋषिसमेत अन्हाये। विविध दान महिदेव न पाये' ह्या चौपाया क्षेपक आहेत. कारण यांचा संबंध रामकथेशीं नसून क्षेपकाशीं आहे. व हें सर्व वर्णन वंध्येच्या पुत्राच्या लग्नप्रसंगाच्या वर्णनासारखें आहे. असेंच वर्णन बहुतेक मराठी कवींनीं केलें; पण ही सर्व अंधश्रद्धा.

आनंदी रामायणांत, रामलक्ष्मण संयुक्तोमुनिस्तं (मिथिला) नगरं ययौ ॥ गमनावसरे मार्गे भर्तृशप्तां शिलांमुनिः ॥ १ ॥ मुनिरूप महेंद्रेण भुक्तां रहसि शोभनां ॥ गौतमस्यांगतां नाम्ना अहल्यां कथयत्तयोः ॥ १७ ॥ " नंतर " नदीरूपा जनस्थानें अहल्या गौतमशापतः ॥ रामेण भ्रमतारण्ये स्वांघ्रिस्पर्शात्स-तद्धृता ॥ २१ ॥ " असे श्लोक आहेत. (आ. रा. सा. का. स. ३) परंतु ह्या उल्लेख कोणीं दुसऱ्यानें केला नाहीं. अर्थात हें मत कोणाला ग्राह्य नाहीं म्हणून त्या संबंधानें येथें विचारही केला नाहीं. ह्या श्लोकानंतर " रामे नौकां कांक्षमाणे नौका पोवाक्यमब्रवीत् ॥ आदावहंक्षालयित्वा पादरेणुंस्तवप्रभो ॥ २४ ॥ पश्चान्नौकां स्पर्शयामितव पादौरघूद्वह ॥ नोचेत्वत्पादरजसा स्पृष्टा नारी भविष्यति ॥ २५ ॥ अस्तिमेगृहिणी गेहे किंकरोम्य परां स्त्रियं ॥......... ॥ २६ ॥

असें लिहिलें. अर्थात मागील विचाराप्रमाणें हेंही वास्तवार्थाला धरून नसल्यामुळें केवळ रोचक आहे असें ठरलें. ×

कित्येकांच्या मतें अहल्योद्धार हें प्रकरण ऐतिहासिक नसून काल्पनिक आहे. कारण वेदांत अहल्या हें नांव उषेचें आहे. व "शक्रः शु शुक्वॉउषोन जारः" "उषोनजारो विभावोस्रः" ह्या मंत्रांत इंद्राला उषेचा जार म्हटलें (ऋ. अ. १ सू. ६९ मं. १, ८ ) पण ह्या ठिकाणीं हें लक्षांत ठेवावें कीं, वेदांतील इंद्र व उषा ह्या कांहीं देहधारी व्यक्ति नव्हेत. ह्या नैसर्गिक देवता असून त्यांचें अलंकारिक वर्णन वेदानें केलें. कोणी म्हणतात याच रूपकाचा विस्तार करून वाल्मीकींनीं कथानक रचिलें. हें जर सत्य मानिलें तर गौतमाचा पुत्र

---

×आनंदी रामायण हें अध्यात्म रामायणाच्या पूर्वीं झालें असा कित्येकांचा तर्क आहे. तो खरा धरला तर आनंदी रामायणाचे रोचक विचार अध्यात्मकारानें घेतले असें म्हणावें लागेल. हें कथानक खऱ्या मिथिला नगरीला धरून नाहीं, कदाचित् गौतमाश्रम व मिथिला हे दोन्ही नवीनच कल्पिले असतील तर नकळे. परंतु संकेत रामायणांत हें कथानक वनवास प्रसंगांत वर्णन केलें आहे.

शतानंद हा जनकाचा पुरोहित होता, ह्या ऐतिहासिक गोष्टीची काय वासलात लागेल ? अर्थात अहल्येचा पुत्र शतानंद हा जर ऐतिहासिक धरला तर गौतम व अहल्या ह्याही व्यक्ति ऐतिहासिकच आहेत हें सिद्ध होतें. आतां राहिला इंद्र हा काल्पनिक आहे किंवा ऐतिहासिक आहे याचा विचार करूं.

भरतखंडांत देव, दैत्य, सिद्ध, गंधर्व, विद्याधर, किंपुरुष, पैत्रिक, आर्य, मानव, गुह्यक, राक्षस व पिशाच्च ह्या जातीचे लोक राहात होते असें वामनपुराणांत सांगितलें, त्याच लोकांपैकीं पामीर पाठारावर राहाणारे आर्य आपणास देव म्हणवीत असत, व त्या पामीरलाच स्वर्ग ही संज्ञा होती, असें वायुपुराणावरून समजतें. तेथील राजाला इंद्र हें नांव होतें. येथील व्यवस्था कांहींशी लोकसत्तेसारखी होती, व इंद्राधिकारही कांहीं अटीवर अवलंबून असल्यामुळें त्या अटी इतरांकडून पूर्ण न होतील अशा तऱ्हेची खटपट स्थानापन्न इंद्र करीत असे. म्हणजे कोणी तपश्चर्या करीत असला अथवा शंभर यज्ञाची प्रतिज्ञा करून यज्ञ करीत असला तर तो इंद्रपद घेण्याचीच खटपट करीत आहे अशा शंकेनें तो यज्ञांत अथवा तपांत विघ्न करीत असे. अशा प्रकारच्या उपद्व्यापी स्वभावाप्रमाणें त्यानें गौतमाच्या पुण्यांत उणेपणा पाडण्याकरितां त्याच्या पतिव्रता स्त्रियेला भ्रष्ट केलें. त्याचें तें दुष्ट कृत्य समजण्याबरोबर गौतमानें त्याला वृषणरहित करून पुरुषत्वापासून भ्रष्ट केलें. पुढें तो इंद्र स्वस्थानीं गेल्यावर सिद्ध, गंधर्व, चारण व अग्निप्रभृति देवांना ( सभासदांना ) म्हणाला, " कुर्वतातपसो विघ्नं गौतमस्य महात्मनः ॥ क्रोधमुत्पाद्यहिमयासुरकार्य— मिदंकृतम् ॥ २ ॥ अफलोऽस्मिकृत, स्तेनक्रोधात्साच निराकृता ॥ शापमोक्षण महता तपोऽस्यापहृतंमया ॥ ३ ॥ तन्मांसुरवराःसर्वे सर्षिसंघाः सचारणाः "सुरकार्यकरं यूयं सफलं कर्तुमर्हथ ॥ ४ ॥ " ( वा. रा. १४९ ) अर्थ " महात्मा गौतमाच्या तपामध्यें विघ्न यावें एतदर्थ त्याला क्रोध आणून ( त्याच्या तपाचें फल जी इंद्रपदप्राप्ति ती त्याला न मिळूं देणें ) हें देवकार्य मीं केलें असें नसतें मीं केलें तर त्याच्या उग्र तपानें तो इंद्र होऊन येथें मानवअधिकारी झाले असते व मग तुम्हा

देवांना स्थानभ्रष्ट व्हावें लागलें असतें. आतां मीं जें तुम्हांकरितां कृत्य केलें त्याचें फल ( क्रोधामुळें रागारागानें ) त्यानें मला वृषणरहित केलें व तिचा ( अहल्येचा ) ही शापपूर्वक परित्याग केला. अशा रीतीनें त्याला मोठा शाप देण्याला लावून मीं त्याचें तप हरण केलें. तस्मात् ऋषिसमुदाय चारण ह्यांसह-वर्तमान सर्व सुरश्रेष्ठ हो, ( माझ्या स्थितीचा विचार करून जेणेंकरून मी देवकार्य करण्यास योग्य होईन अशा रीतीनें मला तुम्ही वृषणयुक्त करा. " हें त्याचें म्हणणें ऐकून देवांनीं पितृगणाला सांगून त्याच्या यज्ञांतील बकऱ्याचें वृषण काढून इंद्रास * लावलें व त्यायोगानें तो इंद्र पूर्ववत् पौरुषयुक्त झाला.

ह्या विवेचनावरून पामीरवरील आर्यांचा राजा इंद्र यानें अहल्येला भ्रष्ट केलें तेव्हां गौतमानें त्याला वृषणरहित केलें व अहल्येस कांहीं नियम सांगून पापक्षालनार्थ तपश्चर्या करावयास लावून स्वतः आश्रम सोडून निघून गेला हें सिद्ध झालें. आतां इंद्रानें अहल्येस भ्रष्ट केलें त्यांत अहल्येचा कांहीं अपराध आहे काय ? तिचा अपराध नसला तर गौतमांनीं तिचा त्याग अन्यायानें केला असें म्हणावें लागेल. व ती अपराधी असेल तर जाणूनबुजून दुराचरण करणाऱ्या स्त्रियेची पातिव्रत्यांत गणती कशी झाली ? इत्यादि प्रश्न उद्भवतात. त्याचा विचार करूं

ईंद्रानें गौतमाचें सोंग घेतलें होतें. तरी त्याच्या मूळस्वरूपांत कांहीं बदल झाला होता असें दिसत नाहीं. कारण तो येण्याबरोबर " मुनिवेषं सहस्राक्षं विज्ञाय०....मतिंचकार दुर्मेधा देवराज कुतूहलात् ॥ अथाब्रवीत्सुरश्रेष्ठं कृतार्थेनान्तरात्मना ॥ कृतार्थास्मिसुर श्रेष्ठ गच्छशीघ्रमित प्रभो ॥ २ ॥ " (वा. रा. १।४८।१९.२० ) असें वाल्मीकींनीं लिहिलें. ह्यांत प्रथमतःच तो इंद्र आहे असें ओळखून त्याच्याशीं रममाण व्हावें असें तिनें मनांत आणलें म्हणूनच वाल्मीकींनीं तिला 'दुर्मेधा' म्हटलें. आणि

* ह्यावरून अति प्राचीन काळीं आर्य लोकांत शस्त्रक्रिया ( सर्जरी ) किती उच्चतेला पोहोंचली होती हें वाचकांच्या लक्षांत येईलच.

समागम झाल्यावरही प्रसन्न अंतःकरणानें ती त्याला म्हणाली, "हे प्रभो, मी आज कृतकृत्य झालें (आतां माझा पति घरीं येण्याची वेळ झाली करितां) तुम्ही सत्वर निघून जा." हें तिचें कृत्य अत्यंत जारिणी स्त्रियेसारखें झालें. म्हणून ती वृंदेची बरोबरी करूं शकत नाहीं. वृंदेला विष्णूनें तिच्या नवऱ्याचें हुबेहूब इतकें बेमालूम रूप घेऊन फसविलें कीं, समागम झाल्यावरही मी परपुरुषाशीं रत झालें असें तिच्या मनांत आलें नाहीं. शेवटीं आपण पातिव्रत्यापासून भ्रष्ट झालों हें तिला समजावें म्हणून रतिप्रसंगांतच तिला आपलें मूळचें चतुर्भुजरूप दाखविलें. पण तें रूप पाहून तिला संतोष वाटणें तर एकीकडेच राहिलें. उलट रागावून तिनें विष्णूस शाप दिला व स्वतः आपला देह जाळून घेतला. म्हणून अशा पतिव्रतेची अहल्या बरोबरी करीत नाहीं असें वर म्हटलें. अशा प्रकारची जरी ती दुष्ट होती तरी गौतमांनी "तूं दगड हो" असा भयंकर शाप न देतां 'इहवर्ष सहस्राणि बहूनि निवसिष्यसि' "वातभक्षा निराहारा तप्यन्ती भस्मशायिनी ॥ अदृश्या सर्वभूतानामाश्रमेऽस्मिन्वसिष्यसि ॥" असें तिला सांगितलें (वा. रा. १।४८।२९-३०) कारण 'विप्रदुष्टां स्त्रियं भर्ता निरुंध्यादेक वेश्मनि ॥ यत्पुंसः परदारेषु तच्चैनांकारयेद्व्रतम् ॥' १७६ ॥ म्हणजे 'जी स्त्री अत्यंत' दुष्ट असेल (स्वतः पर पुरुषाला बोलावून त्याच्याशी रत झाली असेल) तर भर्त्यानें (ती कोणाच्या दृष्टीस पडणार नाहीं अशा रीतीनें) एका घरांत कोंडून ठेवावी व परदारागमनाविषयीं पुरुषाला जें प्रायश्चित सांगितलें आहे तेंच प्रायश्चित्त तिच्याकडून करवावें, असें वचन आहे. (म. अ. ११ वा) आणि इतकेंही करून पुनः ती तसलेंच पातक करील तर तिला 'प्राजापत्यकृच्छ्र व चांद्रायण व्रत' करवयास लावून शुद्ध करून घ्यावें असें मनु म्हणतो (म. ॥ १७७) हा प्रसंग तिच्यावर येऊं नये म्हणून 'दाशरथीराम आल्यावर (इंद्राला पाहून जशी तूं मोहित झालीस तशी मोहित न होतां) निष्काम बुद्धीनें त्याचा सत्कार करशील तर आपली पूर्वीची तनु धारण करून माझ्याजवळ येशील. अर्थात् मीं सांगितल्याप्रमाणें आचरण करशील तर तूं पूर्वीप्रमाणेंच शुद्ध आहेस असें समजून मी तुझा स्वीकार करीन। अशा अर्थाचें

भाषण करून गौतम निघून गेले. पुढें विश्वामित्रासह श्रीरामांनीं त्या आश्रमांत प्रवेश केला तेव्हां तेथें निजलेली अहल्या तपानें तेजस्वी दिसली. तेव्हां श्रीरामानें तिला नमस्कार केला. पुरुषाचा स्पर्श होण्याबरोबर ती उठून उभी राहिली व तो अत्यंत सुंदर असलेला पुरुष दाशरथीराम होय हें समजतांच तिनें त्याचा चांगला सत्कार केला व ती पश्चातापपूर्वक पतीच्या आज्ञेप्रमाणें व्रताचरण करीत राहिली त्या अर्थीं ती दोषमुक्त झाली असें मानून रामानें तिच्या सत्काराचा स्वीकार केला. आतां दूषित स्त्रियाही पतिव्रता कशा राहातात या विषयीं भारतांतील अहल्येचें उदाहरण सांगून नंतर ही रामायणांतील अहल्या पतिव्रता कशी राहिली हें सांगतों.

अंगीरस कुलामध्यें गौतम नांवाचे ऋषि होऊन गेले. त्याच्या घरीं एक वेळ इंद्र ब्राम्हणाचें सोंग घेऊन अतिथिरूपानें आला. गौतमांनीं त्याचा चांगला सत्कार केला; पण पुढें तो त्याच्या स्त्रियेशीं रत झाला हें पाहून गौतमांनीं आपल्या चिरकारी नावाच्या पुत्रास स्त्रियेचा ( चिरकारीच्या मातेचा ) वध करावयास सांगून स्त्रियेचा त्याग केला. व स्वतः वनांत तपश्चर्या करावयास निघून गेले.

नंतर चिरकारी विचार करूं लागला कीं "पितुराज्ञा कथंकुर्यांनहन्यां मातरंकथं॥ कथंधर्मच्छलेनास्मिन्निमज्जेयमसाधुवत् ॥१०॥ पित्रुराज्ञा परोधर्मः स्वधर्मो मातृ-रक्षणम् ॥ अस्वतंत्रंच पुत्रत्वं किंनुर्मानानुपीडयेत् ॥११॥ स्त्रियंहत्वा मातरंच कोहिजातु सुखी भवेत् ॥ पितरंचाप्यवज्ञाय कःप्रतिष्ठामवाप्नुयात् ॥ १२ ॥ याप्रमाणें मातापित्याविषयीं विचार करून ज्याअर्थीं स्त्रियेच्या रक्षणाविषयीं सर्वस्वी भार तिच्या पतीवर आहे त्याअर्थीं तिचेकडून दुष्कृत्य घडलें तरी "नापराधोस्तिनारीणां नराएवापराध्यति " असा निर्णय करून त्यानें आपल्या मातेचा वध केला नाहीं. पुढें गौतम घरीं आल्यावर त्यांना हें समजलें तेव्हां पश्चात्तापपूर्वक ते म्हणाले ' एवंनस्त्री नचैवाहंनाध्वगस्त्रिदशेश्वरः अपराध्यति धर्मस्य प्रमादस्त्वपराध्यति ' ॥ ५० ॥ असें म्हणून मातेचें रक्षण केल्याबद्दल त्यांनीं पुत्रास शाबासकी देऊन स्त्रियेचा स्वीकार केला ( म. भा. शा. प. अ. २६७ )अर्थात त्यांनीं तिला साध्वी ठरविलें. एकंदरींत ह्या चरि-

त्रावरून व "अदुष्टास्तुस्त्रियो....इ. वं. भ. प.अ. ५ श्लो. ३८ ह्या वचनावरून अहल्या निर्दोषी ठरते, दुसरा जरी तिच्याकडून अपराध झाला तरी त्याबद्दल पश्चात्ताप करून तिनें पतीची आज्ञा अक्षरशः पाळली ह्मणून श्रीरामांनीं ती शुद्ध आहे असें ठरवून तिच्या आतिथ्याचा स्वीकार केला आणि ज्याअर्थी श्रीरामासारख्या थोर पुरुषांनीं ती पवित्र ठरविली तिला आपण अपवित्र म्हणणें हा दोष आहे. कारण पूर्वीं असेंच ठरलें होतें. असा विचार करून त्यांनीं तिचा स्वीकार केला.

ह्या चरित्रावरून जे सिद्धांत निघतात ते हे.

१ गौतमांनीं अहल्येस शिळा हो असा शाप दिला नाहीं.

२ श्रीरामांनीं दगडाची स्त्री केली नाहीं. तर अहल्येची एकनिष्ठतेनें पतिआज्ञापालनरूप तपश्चर्या पाहून तिचें आतिथ्य स्वीकारून तिला पुनित केलें ह्याच अहल्योद्धार.

३ अध्यात्मांतील नाविकाचा वृत्तांत अस्थानी असून काल्पनिक आहे.

४ शास्त्राप्रमाणें व पतिआज्ञापालनरूप तपश्चर्येनें अहल्येची गणना पातिव्रत्यांत झाली.

ह्याप्रमाणें अहल्योद्धाराचा हा लहानसा निबंध लिहून सद्गुरुचरणारविंदीं, अर्पण केला.

**स्वामी कृष्णानंद.**
( पूर्वाश्रमीचे कृष्ण जोगेश्वर भीष्म. )
मनोपा, नागपूर.

---

श्रीसाईबाबांनीं कै. लोकमान्य टिळक प्रभृति त्या वेळेचे लहान--थोर हिंदू, मुसलमान, पार्शी, खिस्ती आदि सर्व जातींचे गृहस्थ आपल्या पायांपाशीं आणवून, त्यांना, त्यांच्या स्वमतांना योग्य वळण लावून, पाश्चात्य संस्कृतींच्या निरर्थक मोहजाळापासून परावृत्त करून, इतरांच्या मतांविषयीं जी परस्पर सहिष्णुता व एकी त्यांच्यांत उत्पन्न केली, त्याचें द्योतक म्हणून श्रीलीलेंत अनुभवांना प्रथमतः पूर्ण प्राधान्य देऊन, नंतरच भक्तांनीं पाठविलेले स्फुट लेख प्रसिद्ध करण्यांत येतील. या स्फुट लेखांतील विविधता, विचार व आचार सर्वच संपादकाला संमत असणें संभवनीय नाहीं.

**संपादक.**

## वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

## वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें अगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।= मागील अंकास शिल्लक असल्यास -॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला.**

## लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बालबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हांला कळविल्याशिवाय लेखकांना तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दश: प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक—**श्रीसाईलीला.**